दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २२३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.१३ नोव्हेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# लाचखोर मिनल दळवी यांना दोन दिवसाची पोलीस कोठडी

## दळवीकडे ६० तोळे सोने आणि कोट्यावधींची रोकड

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

**अलिबाग तहसीलदार मीनल दळवी आणि एजंट राकेश चव्हाण यांना लाच घेतल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती. दळवी आणि चव्हाण याना आज शनिवारी न्यायाधीश अशोककुमार भिलारे याच्या न्यायलायात सुनावणी पार पडली. न्यायालयाने दोघांनाही सोमवारपर्यंत दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.**



फिर्यादी याच्या सासऱ्यांना मिळालेल्या बक्षीस पात्र जमिनीवर नाव चढविण्यासाठी आणि सासऱ्याच्या भावाने बक्षीस पत्रावर घेतलेल्या हरकतीचा अपील प्रकरणात निकाल सासऱ्याच्या बाजूंना द्यावा यासाठी तहसीलदार मीनल दळवी यांनी तीन लाखाची लाच मागितली होती. याबाबत फिर्यादी यांनी २८ सप्टेंबर रोजी नवी मुंबई लाच लुचपत विभागाकडे तक्रार केली होती. २९ सप्टेंबर रोजी पथकाने याबाबत सत्यता पडताळून रकमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले होते.

**महिन्याभरापासून लाच लुचपत पथक हे तहसीलदार दळवी याच्या मागावर होते. अखेर ११ नोव्हेंबर रोजी सापळा रचून नवी मुंबई पथकाने फिर्यादी यांच्याकडून दोन लाख घेताना राकेश चव्हाण याला अटक केली. तर दळवी यांच्यासाठी पैसे घेतल्याचे चव्हाण याने सगितल्याने त्यांनाही अटक करण्यात आली.**

शनिवारी १२ नोव्हेंबर रोजी दळवी आणि चव्हाण यांना जिल्हा न्यायलायत हजर केले. न्यायाधीश अशोककुमार भिलारे यांनी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून लाचखोर अधिकारी मीनल दळवी, एजंट राकेश चव्हाण याना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. महसूल विभागात भ्रष्ट्राचार मोठ्या प्रमाणात होत असल्याचे या प्रकरणावरून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

### दळवींकडे साठ तोळे सोने

अलिबागची लाचखोर तहसीलदार मीनल दळवी यांना लाच घेताना जेरबंद केल्यानंतर त्यांच्या संपत्तीची मोजदाद सुरू केली असता, त्यांच्याकडे तब्बल ६० तोळे सोने आढळले असून अलिबाग येथे गाडी आणि घरात मिळून ७५ हजार रुपयांची तर, मुंबईतील विक्रोळी येथील घरातून एक कोटीहून अधिक रोख रक्कम सापडली असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.

### एफडीएची नवी मुंबई महापे येथे कारवाई

# २७ लाखांहून अधिक किमतींचा अन्न पदार्थांचा साठा जप्त



**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

दैनंदिन जीवनात ग्राहकाकडून नियमितपणे उपयोगात आणल्या जाणाऱ्या विविध अन्नपदार्थासह खाद्यतेल व पावडर मसाले यांच्या गुणवत्ता व दर्जा यांची खात्री व खातरजमा करण्यासह सर्व सामान्य जनतेस सकस, निर्भेळ व सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत यासाठी अन्न व औषध प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. १० नोव्हेंबर २०२२ रोजी मेसर्स वेदिक स्पाइसेस प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर ए- ३६२, महापे एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई या ,उत्पादक अन्न आस्थापनातून हळद पावडर (वजन २९६ किलो), धनिया पावडर (वजन ३९९८ किलो), मिरची पावडर (वजन ६४९८ किलो), जीरे पाउडर (वजन ५४५४ किलो) तसेच करी पाउडर (वजन २४९८ किलो) असा एकूण रुपये २७,३९,०००/-- एवढ्या किमतीचा अन्नपदार्थाचा साठा तो गैरछापाचा व कमी प्रतीचा असल्याचा संशयावरून जप्त करण्यात आला.

सदर अन्न आस्थापनातून एकूण ०५ अन्नपदार्थांचे नमुने अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत शासकीय विश्लेषणासाठी घेण्यात आलेल्या असून त्यांचा अहवाल प्राप्त होताच त्या अनुषंगाने उचित कायदेशीर कारवाई घेण्यात येईल.

ही कारवाई अन्न व औषध प्रशासन विभागाचे कॅबिनेट मंत्री संजय राठोड यांचे आदेश व अभिमन्यू काळे, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या सूचनेनुसार सुरेश देशमुख, सह आयुक्त (अन्न), कोकण विभाग, ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. सदर कार्यवाही राहुल ताकाटे, अन्न सुरक्षा अधिकारी, ठाणे यांनी अशोक पारधी, सहाय्यक आयुक्त (अन्न), ठाणे यांचे उपस्थितीत केलेली आहे. जनतेस सकस, निर्भेळ व सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध होण्यासह अन्नविषबाधे सारखी अप्रिय घटना घडू नये म्हणून प्रशासनामार्फत नियमितपणे अशा प्रकारच्या कारवाया नियमितपणे घेण्यात येणार आहेत.

खाद्यतेल उत्पादक यानी खाद्यतेलाचे पैकिंग करने कामी एकदा उपयोग आणलेल्या टिनांच्या डब्यांचा खाद्यतेलाच्या पॅकिंग करण्यासाठी पुनर्वापर करू नये, कोणत्याही खाद्यतेलाचे पॅकिंग करताना विहित दर्जाच्या बी. आय. एस. ग्रेडच्याच टीनाच्या डब्यांचा उपयोग करावा, खाद्यतेलाच्या सर्वांगीण व सर्वकश तपासणी व विश्लेषणासाठी स्वतःची अद्यावत इन हाऊस (अंतर्गत) प्रयोगशाळा ठेवावी. कोणत्याही खाद्यतेलाची लूज, सुट्ट्या किंवा खुल्या स्वरूपात विक्री करू नये. अन्नपदार्थ हाताळणीशी संबंधित असणाऱ्या प्रत्येक कामगारांचे ते संसर्गजन्य रोग आणि किंवा त्वच-रोग यापासून मुक्त आहेत याची खात्री व खातर जमा होण्यासाठी प्राधिकृत वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून वैद्यकीय तपासणी करण्यात यावी. मिठाई या अन्नपदार्थाच्या किरकोळ विक्रेत्यांनी सुट्ट्या स्वरूपातील मिठाईच्या ट्रेवर सदर मिठाई कोणत्या तारखेपर्यंत वापरावी याबाबतचा स्पष्ट उल्लेख नेहमी करावा.

# गार्डन मधील अनावश्यक असणारे शौचालय रद्द करा

## विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांची मागणी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल सेक्टर ३ येथील भूखंड क्रमांक ५६ आणि ५७ या गार्डन भूखंडावर नव्याने सुशोभीकरण होत आहे. ते होत असताना सदरच्या प्लॅनिंग मध्ये दोन्ही ठिकाणी शौचालय नव्याने उभारणी होत आहे. सदर गार्डन पासून ५० ते १०० मीटर अंतरावर दोन्ही बाजूवरील मुख्य रस्त्यांवर सार्वजनिक शौचालय आहेत. तसेच त्या परिसरात राहणाऱ्या आणि त्या परिसरात बाहेरून येणाऱ्या व्यक्तींसाठी सद्यस्थितीमध्ये सुरू असलेली दोन्ही शौचालय आहेत. असे असताना सुद्धा पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून विकसित करण्यात येत असलेल्या गार्डनमध्ये नव्याने शौचालय बांधण्यात आल्याने नागरिकांच्या पैशाचा व्यवस्थित वापर होत नाही तसेच गार्डन मधील जागा शौचालयासाठी विनाकारण वापरली जात होती.

या काही गोष्टींमुळे तेथे राहणाऱ्या स्थानिक नागरिकांचा या नव्याने होत असलेल्या शौचालयाला विरोध आहे. ही तक्रार विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांच्याकडे स्थानिक नागरिकांसोबत नवीन पनवेलचे शेकाप नेते प्रभाकर कांबळे यांनी केली. .../२

नागरिकांची तक्रार आल्यावर त्या ठिकाणी पाहणी केली असता शौचालयाची आवश्यकता नाही हे पालिका अधिकाऱ्यांनी सुद्धा माझ्यासमोर मान्य केले आणि संबंधित शौचालयाचे बांधकाम आम्ही थांबवतो असे सांगितले. आम्ही अशा प्रकारची पनवेल महानगरपालिका क्षेत्रात अजूनही विकास कामे जी सुरू आहेत त्या ठिकाणी अनावश्यक अशाप्रकारे जर जनतेच्या पैशाचा अपव्यय होत असेल तर आयुक्तांनी त्यावर लक्ष घालून त्वरित ते बांधकाम थांबवावे असे विनंती केली.


– प्रितम जनार्दन म्हात्रे, विरोधी पक्षनेते पनवेल महापालिका

# परिमंडळ २ पोलीस उपायुक्तपदी पंकज डहाणे

## पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी अनिल पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पोलीस आयुक्त कार्यालय नवी मुंबई अंतर्गत आज काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. त्यामध्ये परिमंडळ २ पोलीस उपायुक्तपदी पंकज डहाणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी अनिल पाटील यांनी पदभार स्वीकारला आहे.**



आज करण्यात आलेल्या पोलीस खात्यातील बदल्यांमध्ये रा.रा.पोलीस बल गट क्रं.४ नागपूर येथे कार्यरत असलेले पंकज दिलीपराव डहाणे यांची नवी मुंबई आयुक्तालयातील परिमंडळ २ या ठिकाणी बदली करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पोलीस अधिक्षक फोर्स १ महाराष्ट्र राज्य मुंबईचे तिरुपती काकडे यांची नवी मुंबई आयुक्तालयातील पोलीस उपआयुक्त वाहतूक शाखा नवी मुंबई येथे बदली करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पोलीस उपायुक्त परिमंडळ १ मिरा-भाईंदर-वसई-विरार येथील अमित काळे यांची पोलीस उपायुक्त नवी मुंबई गुन्हे शाखा येथे नेमणूक करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पोलीस उपायुक्त परिमंडळ २ मिरा-भाईंदर-वसई-विरार येथील संजयकुमार पाटील यांची नवी मुंबई पोलीस उपायुक्त विशेष शाखा येथे बदली करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सिबीडी पोलीस ठाण्याचे वपोनि अनिल पाटील यांची पनवेल तालुका पो-लीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी नेमणूक करण्यात आली आहे. तर त्यांच्या जागी वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि रवींद्र दौंडकर यांची बदली तुर्भे पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे. नेरुळ पोलीस ठाण्याचे वपोनि श्याम शिंदे यांची बदली नियंत्रण कक्ष नवी मुंबई येथे करण्यात आली आहे.

तुर्भे पोलीस ठाण्याचे वपोनि राजेंद्र आव्हाड यांची दंगल नियंत्रण पथक करण्यात आली आहे. तर कोपरखैरणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप तिदार यांची आरबीआय या ठिकाणी बदली करण्यात आली आहे. तसेच एपीएमसी वाहतूक शाखेचे वपोनि अतुल आहेर यांची बदली गुन्हे शाखा अ.मा.वा.प्र.कक्ष येथे करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे एनआरआय पोलीस ठाण्याचे वपोनि रवींद्र पाटील यांची गुन्हे शाखा कक्ष २ येथे बदली करण्यात आली आहे. रबाळे पोलीस ठाण्याचे वपोनि अजय भोसले यांची कोपरखैरणे पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे गुन्हे शाखा अ.मा.वा.प्र.कक्ष पराग सोनावणे यांची बदली गुन्हे शाखा येथे करण्यात आली आहे. तसेच कामोठे पोलीस पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उत्तम जगदाळे यांची बदली एनआरआय पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे. व यातील अनेक अधिकाऱ्यांनी आज पदभार स्वीकारला आहे.

# जितेंद्र आव्हाड यांच्यासह सर्व अखेर जामीन मंजूर



**दै.रायगड नगरी । ठाणे**

माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्यासह १२ जणांना न्यायालयाने दिलासा दिला आहे. न्यायालयाने आव्हाड यांना जामीन मंजूर केले आहे. काल आव्हाड यांना ठाणे येथील चित्रपट गृहात प्रेक्षकाला मारहाण प्रकरणी ताब्यात घेतले होते. त्यांना आज कोर्टाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली होती. यानंतर आव्हाड यांच्या वकीलांनी त्यांना जामीनासाठी अर्ज दाखल केला होता.

माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्यासह १२ जणांना अटी-शर्तीसह जामीनाला न्यायालयाने मंजुरी दिली आहे. १५ हजारांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर जामीन मंजूर करण्यात आला आहे. तसेच, पोलिसांच्या तपासात त्यांना सहकार्य करण्याची अटही न्यायालयाने त्यांना घालती असून त्यानंतरच जामीन मंजूर झाला आहे.

माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्यावर न्यायालयात सुनावणीला आज सकाळी सुरुवात झाली. आव्हाड यांच्या वतीने ॲड प्रशांत कदम यांनी आव्हाडांच्या अटकेवर युक्तिवाद केला. आव्हाड आणि इतर लोकांवर दाखल केलेले गुन्हे चुकीचे .../२

# शेकापला करंजाडेत आणखी एक धक्का; शेकाप कार्यकर्ते भाजपात

**दै.रायगड नगरी । पनवेल**



शेतकरी कामगार पक्षाला पनवेल तालुक्यात गळती लागली असून करंजाडे येथील लालवाडी आदीव-ासी मधील शेकापच्या कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहिर पक्ष प्रवेश केला आहे. भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेऊन शेकापचे रोहिदास वाघे यांच्या नेतृत्वाखाली आदीवासी बांधव आणि भगीनींनी भाजपचे कमळ हाती घेतले आहे. हा पक्ष प्रवेश सोहळा भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी झाला.

भाजपच्या पनवेल तालुका व शहर मध्यावर्ती कार्यलयात झालेल्या या पक्ष प्रवेशावेळी बंदु देवजी वाघे, वेगु देवजी वाघे, गोविंद वाघे, राधिका वाघे, सुदाम वाघे, तुळसा वाघे, रोहिदास वाघे, वनिता वाघे, गंगा वाघे, बंधू पवार, उज्वला पवार, सुमन पवार यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला आहे. .../२

# वळवली गावात येत्या काळात अनेक विकासाची कामे होणार : परेश ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**



वळवली गावात येत्या काळात अनेक विकासाची कामे होणार असल्याने हे गाव सुंदर आणि आदर्श गाव म्हणून ओळखले जाईल, असे मत पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी रस्त्याच्या कामाच्या भुमीपूजनावेळी केले. भारतीय जनता पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या प्रयत्नांमुळे महापालिका हद्दीतील अनेक विकासाची कामे मार्गी लागत आहेत. त्यापार्श्वभुमीवर महापालिकेच्या माध्यमातून वळवली गावातील मुख्य रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात येणार आहे. या विकास कामाचे पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी भुमीपूजन झाले.

यावेळी माजी नगरसेवक माजी नगर-सेवक हरेश केणी, महादेव मधे, माजी सरपंच शशिकांत शेळके, भाजपनेते कृष्णा चौधरी, वॉर्ड अध्यक्ष सचिन चौधरी, मारुती चिखलेकर, महिला मोर्चाच्या .../२

# मोदींवरच मदार

भारतीय जनता पक्षाने गुजरात विधानसभेचे उमेदवार जाहीर करताना नेहमीप्रमाणेच धक्कातंत्राचा वापर केला. पहिल्या यादीत ३८ विद्यमान आमदारांना उमेदवारी नाकारून नव्या चेहऱ्यांना पसंती दिली गेली. विजय रुपानी व नितीन पटेल या माजी मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी लढण्यास नकार दिल्याने पक्षाचे काम आणखी सोपे झाले. सोबत पाच विद्यमान मंत्र्यांना डच्चू देताना, काँग्रेसमधून आलेल्या सर्व २३ आमदारांच्या उमेदवारीद्वारे आयाराम संस्कृतीला चालना दिली. पाटीदार आंदोलनात भाजपला लक्ष्य करून काँग्रेसचा हात हातात घेतलेला; पण त्याचाही त्याग करून अलीकडेच भाजपमध्ये आलेला युवा नेता हार्दिक पटेल यालाही उमेदवारी देऊन पावन करून घेतले गेले. काँग्रेसशी जवळीक असलेल्या जडेजा कुटुंबियांतील क्रिकेटपटू रवीन्द्र जडेजा याची पत्नी रिवाबा हिला उमेदवारी देताना, काँग्रेसनिष्ठांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न दिसतो. जडेजाची बहीण मात्र काँग्रेसकडून लढणार आहे. वहिनी-नणंदेची थेट लढत होणार का, ते अद्याप स्पष्ट नाही. पहिल्या यादीत चौदा महिलांना संधी मिळाली असली,तरी १८२ जागांच्या विधानसभेत हे प्रमाण आठ-दहा टक्क्यांपेक्षा अधिक नसेल, हे निश्चित. मोरबीच्या विद्यमान आमदाराला घरी पाठवून पूल दुर्घटनेतील मृतांचे नातेवाईक आणि स्थानिक मतदारांच्या रोषावर फुंकर घालण्याचा प्रयत्न झाला आहे. दर खेपेस नव्या चेहऱ्यांना संधी देऊन सरकारबद्दलचा राग शमविण्याचे धोरणही कायम ठेवले गेले आहे. रुपानी यांनी स्वत:हून उमेदवारीस नकार दिल्याचे भासविले असले तरी प्रत्यक्षात तसा पक्षादेशही असू शकतो. बेरोजगारी हा मुद्दा गुजरात निवडणुकीत यापूर्वी कधीच नव्हता. यंदाची निवडणूक मात्र त्याला अपवाद असल्याने बेरोजगारीसह महागाईच्या समस्येला भिडण्यासाठी लक्षावधी कोटींचे प्रकल्प राज्यात आणण्याच्या घोषणा झाल्या आहेत. सध्या इंधनाचे दर स्थिर राहण्यामागेही या निवडणुका आहेत, हे वेगळे सांगायला नको. २७ वर्षांत भाजपने गुजरातचा चेहरामोहरा बदलल्याच्या 'गुजरात पॅटर्न'वर मोदींसह भाजपने देशभरात सत्तारोहण केले असले, तरी प्रत्यक्षात वस्तुस्थिती वेगळीच असल्याचे विविध माध्यमांतून पुढे येत आहे. सध्या तिशी-पस्तिशीतील युवा पिढी भाजपला सत्तेत बघतच मोठी झाल्याने बदल घडविण्याची भावना त्यांच्यात प्रबळ होऊ शकते. सुरत महापालिकेत २७ जागा मिळवून आम आदमी पक्षाने गुजरातमधील या असंतोषाला वाचा फोडली. तेव्हापासूनच या पक्षाने गुजरात अजेंड्यावर ठेवले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही त्यांनी मुसंडी मारली. अलीकडे तर अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया आदींनी गुजरातमध्ये झंझावाती प्रचारसभा घेऊन वातावरण चांगलेच तापविले आहे. काँग्रेसची स्थिती दिवसेंदिवस खालावत असताना, ती पोकळी भरून काढण्याचा आप चा प्रयत्न स्वाभाविक आहे. त्यामुळे गुजरातमध्ये तिरंगी लढतींचे चित्र निर्माण झाले. शहरी भागात आपला चांगला प्रतिसाद मिळत असला तरी ग्रामीण भागात कार्यकर्त्यांचे जाळे नसल्याने फुगा कितीही फुगवला तरी आपची सत्तेपर्यंत झेप जाणार नाही. बिल्कीस बानो प्रकरणात आरोपींना सोडल्यानंतर या पक्षाने काहीही भूमिका न घेतल्याने अल्पसंख्यांक व मागास समाज धास्तावले आहेत. काँग्रेसच्या या पारंपरिक मतदारांचा आप कडे कल दिसत असताना, हे प्रकरण घडल्याने ही मते पुन्हा काँग्रेसकडे परततील. आपची धास्ती घेऊन भाजपनेही रणनीती बदलत सर्वाधिक ओबीसी उमेदवार दिले आहेत. दस्तुरखुद्द मोदी यांच्या ४० हून अधिक सभांचे नियोजन आहे. आपच्या प्रभावाचा फटका काँग्रेसला बसेल आणि भाजपला बहुमताकडे आरामात जाता येईल, अशी अटकळ बांधली जात आहे. त्यात अजिबात तथ्य नाही, असेही नाही. मात्र, आपने देखील आता हिंदूंना चुचकारण्याचे प्रयोग चालू केल्याने शहरी भागात भाजपसाठी ती डोकेदुखी ठरणार, यात शंका नाही. गुजरातमध्ये पाटीदार समाजाचा सत्ताकारणावर प्रभाव असला तरी अलीकडे प्रत्येक समाजालाच अस्तित्वाचे भान आले आहे. अशा छोट्या जातसमूहांचे समाधान करणे, ही अत्यंत अवघड व किचकट बाब आहे. त्यामुळेच उमेदवार निश्चित करताना, भाजपच्या मुखंडांना प्रदीर्घ चर्चा करीत बसावे लागले. आप चा धोका दिसत असतानाच, राहुल गांधी यांच्या भारत जोडा यात्रेला मिळणाऱ्या अभूतपूर्व प्रतिसादामुळे भाजप सावध झाल्याचे जाणवते. राहुल यांनी हिमाचल प्रदेशमधील प्रचारापासून अंतर राखले असले तरी गुजरातमध्ये ते अखेरच्या टप्प्यात सक्रिय होऊ शकतात. निवडणूकपूर्व मतदार चाचण्यांमध्ये भाजपला पुन्हा संधी मिळणार, असेच भाकित वर्तवले आहे. नरेंद्र मोदी हेच भाजपचे खणखणीत नाणे असल्याचे त्यांच्या प्रचाराच्या धडाक्यातून दिसते आहे. 'मोदी हैं तो मुमकीन हैं,' हीच जर भाजपची एकमेव ताकद असेल तर सत्तावीस वर्षांच्या सत्तेत पक्षाला विजयी करता येईल, असे काहीच करता आले नाही, ही त्याची दुसरी बाजू आहे. अन् ती तेवढीच ठसठसती आहे.

पनवेल तालुका, पनवेल शहर, तळोजा, उरण, न्हावाशेवा, मोरासागरी

# पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना लेखी अगर तोंडी आदेश देण्याचे अधिकार प्रदान

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

ऑक्टोबर २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायती, नव्याने स्थापित तसेच समर्पित आयोगाच्या अहवालात दिसत नसल्यामुळे मागील निवडणुकांमधून वगळलेल्या ग्रामपंचायतींच्या (सदस्य पदासह थेट सरपंच पदाच्या) सार्वत्रिक निवडणुकांसाठी संगणकप्रणालीव्दारे राबविण्याचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम मा. राज्य निवडणुक आयोगाने जाहीर केल्यामुळे दि.०९ नोव्हेंबर २०२१ रोजीपासून आचारसंहिता अंमलात आली आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीत, परिमंडळ २ मधील पनवेल तहसिल विभागातील पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत चिंध्रण, भाताण, कानपोली, केळवणे, नेरे, दिघाटी, पन-वेल शहर पोलीस ठाणे हद्दीत शिरढोण, शिवकर, करंजाडे, तळोजा पोलीस ठाणे हद्दीत नितळस ग्रामपंचायत तसेच उरण तहसिल विभागातील उरण पोलीस ठाण्याच्या हद्दीत राणसई, पुनाडे, सारडे, नवीन शेवा, धुतुम, कळंबुसरे, बोकडविरा, वशेणी, पागोटे, पिरकोन, चिर्ले, भेंडखळ, नवघर न्हावाशेवा पोलीस ठाणे हद्दीत पाणजे, डोंगरी, करळ, जसखार, मोरास-ागरी पोलीस ठाणेच्या हद्दीत घारापुरी या एकूण २८ ग्रामचपंचायतीमधील निवडणुका होणार असून दि.१८ डिसेंबर २०२२ रोजी मतदान व दि.२० डिसेंबर २०२२ रोजी मतमोजणी होणार आहे.

मतदान शांत, निर्भय व निःपक्षपाती वातावरणात पार पडावे याकरीता नवी मुंबई आयुक्तालय हद्दीत कायदा व सुव्यवस्था राखणे आवश्यक असल्याने पोलीस आयुक्त, नवी मुंबई बिपिन कुमार सिंह यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ कलम ३६ प्रमाणे प्राप्त अधिकारानुसार, नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीतील परिमंडळ २ पनवेल तहसिल विभागातील पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत चिंध्रण, भाताण, कानपोली, केळवणे, नेरे, दिघाटी पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत शिरढोण, शिवकर, करंजाडे, तळोजा पोलीस ठाणे हद्दीत नितळस ग्रामपंचायत तसेच उरण तहसिल विभागातील उरण पोलीस ठाण्याच्या हद्दीत राणसई, पुनाडे, सारडे, नवीन शेवा, धुतुम, कळंबुसरे, बोकडविरा, वशेणी, पागोटे, पिरकोन, चिर्ले, भेंडखळ, नवघर न्हावाशेवा पोलीस ठाणे हद्दीत पाणजे, डोंगरी, करळ, जसखार, मोरास-ागरी पोलीस ठाणेच्या हद्दीत घारापुरी या एकूण २८ मपंचायतींच्या निवडणुका होणार असल्याने पनवेल तालुका, पनवेल शहर, तळोजा, उरण, न्हावाशेवा, मोरासागरी पोलीस ठाणेचे स्वाधीन अधिकारी यांना पुढीलप्रमाणे लेखी अगर तोंडी आदेश देण्याचे अधिकार प्रदान केले आहेत.

रस्त्यावरुन जाणाऱ्या जमावाचे अगर मिरवणुकीतील व्यक्तीचे वागणे अगर कृत्य याबाबत आदेश देणे, ज्या मार्गाने मिरवणुक किंवा जमाव जाईल अगर जाणार नाही ती वेळ व मार्ग निश्चित करणे, सार्वजनिक ठिकाणी अगर सार्वजनिक करमणुकीच्या कार्यक्रमाचे वेळी वापरण्यात येणाऱ्या ध्वनीक्षेपकाच्या ध्वनीची तीव्रता निश्चित करून दिलेली वेळ यावर नियंत्रण ठेवणे,मिरवणुकीचे प्रचाराच्या निमित्ताने जाहीर सभा घेण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ याबाबत नियंत्रण करणे.

हा आदेश नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ -२ मधील पनवेल तालुका, पनवेल शहर, तळोजा, उरण, न्हावाशेवा व मोरासागरी पोलीस ठाणे हद्दीतील ग्रामपंचायतीचे कार्यक्षेत्रात दि.०९ नोव्हेंबर २०२२ चे ००.०१ वा. पासून ते दि. २५ डिसेंबर २०२२ चे २४.०० वा. पर्यंत लागू राहील. या आदे-शाचा भंग करणारी व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम १३४ प्रमाणे कायदेशीर कारवाईस पात्र राहील, असे पोलीस आयुक्त, नवी मुंबई बिपिन कुमार सिंह यांनी कळविले आहे.

# सिडकोच्या भू संपादनाच्या आमिषाला बळी पडू नका : राजाराम पाटील

**दै.रायगड नगरी । उरण**



सिडको प्रशासना कडून सध्या उरणमध्ये भूसंपादनाची प्रक्रिया सुरु आहे. मात्र या भूसंपादनाला किंवा सिडकोच्या कोणत्याही आमिषांना, भूलथापांना बळी पडू नका असे आवाहन ओबीसी नेते, सामाजिक कार्यकर्ते राजाराम - पाटील यांनी केले आहे.

सिडको प्रशासनातर्फे उरण मधील विविध परिसरातील जमीन संपादनाची प्रक्रिया सूरु झाली आहे. मात्र या ज़मीन - (भू) संपादनाला उरण मधील शेतकऱ्यांचा, स्थानीक भूमीपुत्रांचा तीव्र विरोध असून भू संपादनाला विरोध करण्यासाठी उरण तालुक्यातील - बालई येथे एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते राजाराम पाटील यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आयोजक -प्रशांत माळी, गावठाण समितीचे अध्यक्ष विश्वनाथ पाटील,शेतकरी नवनीत भोईर, निलेश भोईर, सामाजिक कार्यकर्ते रविंद्र चव्हाण, बबन चव्हाण यांच्यासह बालई परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना राजाराम पाटील म्हणाले की जमीन मालकांसाठी २०१३ चा भू संपादन कायदा अत्यंत फायदेशीर आहे. मात्र २०१३ च्या भू संपादन कायदयानुसार शेतकऱ्यांचा, जमीन मालकांचा फायदा होणार असल्याने काही अधिकारी, काही राजकारणी नेते हे शेतकऱ्यांना ही बाब समजावून सांगत नाहीत. शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांच्या पिकत्या जमिनी कमी भावाने विकत घेतली जाते व बिल्डर लॉबी तसेच मोठ मोठ्या उद्योगपतीच्या घशात घातली जाते. त्यामुळे इथला स्थानिक भूमीपुत्र, शेतकरी भूमीहिन होऊन उरणच्या बाहेर फेकला जा-तो. त्यामुळे स्थानिक भूमीपुत्रांचे अस्तित्व धोक्यात येते. सिडको प्रशासनाने यापूर्वीही शेतकऱ्यांना योग्य मोबदला दिला नाही. शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार केलेला नाही. त्यामुळे येथील भूमीपुत्रांना शेतकऱ्यांना २०१३ च्या भूसंपादन कायदयानुसार शेतकऱ्यांना भू संपादनाचा लाभ मिळाला पाहिजे अशी मागणी आपल्या भाषणातून राजाराम पाटील यांनी केली. सध्याचे भूसंपादन कायदा व २०१३ चा भूसंपादन कायदा व या कायदयाद्वारे मिळणारे लाभ व नुकसान इत्यादी बाबत सविस्तर माहिती राजाराम पाटील यांनी शेतकऱ्यांना दिली.

सिडकोने अगोदरच साडेबारा टक्केची योजना राबवून येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केली आहे.उरण तालुक्यातील ज्यांच्या ज्यांच्या जमिनी विविध प्रकल्पासाठी संपादित झालेली आहे त्यांचे अजून योग्य पुनर्वसन झालेली नाही. पुनर्वसनाला सिडकोकडे जागाच उपलब्ध नसल्याने सिडको प्रशासन उरण तालुक्यातील ग्रामीण भागाकडे वळले आहे.मात्र ग्रामीण भागात राहती घरे असल्याने सदर जमीन संपादित करता येत नाही. आणि जरी जमीन संपादित झाली तरी मग मूळचा उरणचा नागरिक, स्थानिक नागरिक जाणार कुठे ? त्याचे पुनर्वसन होणार कुठे असा सवाल उपस्थित होतो. या अगोदर सिडको प्रशासनाने योग्य पुनर्वसन न केल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे. आता तर सिडको प्रशासनावर कोणत्याही नागरिकांचा, शेतकऱ्यांचा विश्वास उरलेला नाही.त्यामुळे सिडकोच्या भू संपादन कायद्याला सर्वच शेतकऱ्यांनी कडाडून विरोध केला आहे.

राजाराम पाटील यांच्या मार्गदर्शनाचा लाभ सर्व शेतकऱ्यांना, जमीन मालकांना होणार असल्याने सर्व शेतकऱ्यांनी,जमीन मालकांनी राजाराम पाटील यांना जाहिर पाठिंबा देऊन आपापल्या भावना व्यक्त करत सध्याच्या नवीन भू संपादनाला जोरदार विरोध केला आहे. यासाठी उरण मधील गावोगावी शेतकऱ्यांच्या बैठका सुरु झाल्या आहेत.

# आ.प्रशांत ठाकूर यांच्या निधीमधून टेंभोडे गावात ओपन जिम

**दै.रायगड नगरी । पनवेल**



भारतीय जनता पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष तथा पनवेल मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून अनेक विकासकामे मार्गी लागत असून नागरीकांना विविध सुविधा मिळत आहेत. त्याअंतर्गत टेंभोडे येथे गावात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीमधून ओपन जिम बांधण्यात आली आहे. या जिमचे पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्याहस्ते शनिवारी लोकार्पण झाले.

यावेळी पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक हरेश केणी, महादेव मधे, आसुडगावचे माजी सरपंच शशिकांत शेळके, युवामोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अशोक गडगे, सचीन चौधरी, सुभाष भोईर, राघो कडव, संतोष भोईर, महिला मोर्चा तालुका चिटणीस प्रतिभा भोईर, मारुती चिखलेकर, संदिप भोईर, निवृत्ती भोईर, ललिता भोईर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# सुहित जीवन ट्रस्टच्या अध्यक्षा डॉ.सुरेखा पाटील यांना महासंस्कृती कोकण सन्मान पुरस्कार प्रदान

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण येथील गतिमंद मुलांची शाळा म्हणून ओळख असलेल्या सुहित जीवन ट्रस्टच्या अध्यक्षा डॉ.सुरेखा पाटील यांना महासंस्कृती व्हेंचर्स आयोजित महासंस्कृती कोकण सन्मान २०२२ या पुरस्काराने मुंबई येथे सन्मानित करण्यात आले.

गुरुवार १० नोव्हेंबर २०२२ रोजी शालेय शिक्षण व मराठी भाषा विभाग महाराष्ट्र राज्य मंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते सदर पुरस्कार प्रदान करण्यात आला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, नरिमन पॉईंट, मुंबई येथे या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. पुरस्कार प्रदान कार्यक्रम प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी आपले विचार मांडताना डॉ.पाटील यांनी सांगितले की, आपण विविध प्रयत्नांतून व अत्यंत खडतर प्रव-ासातून सदर गतिमंद मुलांची शाळा चालवीत असून शेवट पर्यंत सदर सेवा करत राहणार असल्याचे जाहीर केले.



सुहित जीवन ट्रस्टच्या अध्यक्षा डॉ.सुरेखा पाटील यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांच्यावर पेण तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यातून अभिनंदन होत आहे.

# संकष्टी चतुर्थीला भाविकांची मांदियाळी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

आय.एस.ओ मानांकन प्राप्त व महाराष्ट्रातील अष्टविनायकांपैकि प्रख्यात धार्मीक स्थळ असलेल्या पाली बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी दि.(१२) शनिवारी संकष्टी चतुर्थीला पालीत भाविकांची अलोट गर्दी दिसून आली. बाप्पाच्या चरणी गणेशभक्त नतमस्तक होऊन धन्य होतायेत. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी नेहमीच राज्य व देशातून भाविक भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थीत राहतात. अशातच दर्शनासाठी येणार्या भाविकांच्या उत्तम सोईसुविधेसाठी बल्लाळेश्वर देवस्थ-ान ट्रस्ट व प्रशासन नेहमीच दक्ष व सज्ज असते. दिवाली पासून दर्शनासाठी येणार्या भाविकांच्या संख्येत कमालीची वाढ झाली आहे. बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे पदाधिकार्यांनी पाली बल्लाळेश्वर देवस्थानात येणार्या भाविक भक्तगणांना आतंरराष्ट्रीय दर्जाच्या सेवासुविधा मिळाव्यात यादृष्टीने सुनियोजन केले आहे. त्यामुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले. सलग लागून आलेल्या सुट्टीत देखील भाविक मंदिरात मोठी गर्दी करीत आहेत. संकष्टी, अंगारकी चतुर्थी दिनी पालीत भाविक भक्तगणांची मांदीयाळी असते. तर माघी मासोत्सवाला संपुर्ण पाली गाव भाविक भक्तगणांनी फुलून जाते. अंगारकी संकष्टी नंतर आलेल्या संकष्टी ला देखील बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी गर्दीचा उच्चांक गाठला. अशा-वेळी भाविक भक्तगणांची कोणतीही गैरसोय होवू नये, त्यांना शिस्तबध्द पध्दतीने रांगेत दर्शन घेता यावे यासाठी देवस्थान तसेच पोलीस प्रशासनाच्या वतीने आवश्यक ती खबरदारी घेत उपाययोजना करण्यात आली होती. सकाळपासूनच दर्शनासाठी लहान थोर, तरुण, महिला वृद्ध यांच्या रांगा लागल्या होत्या. दर्शनासाठी रायगड जिल्हा, महाराष्ट्रातील विविध भागांसह मुंबई, ठाणे पुणे आदी शहरांतील भाविक व पर्यटक मोठ्या प्रमाणावर पालीत दाखल झाले होते. गर्दी असल्याने येथील दुकानदार व हॉटेल व्यवसायिकांचा धंदा देखिल तेजीत होता. बल्लाळेश्वर मंदिर परिसरात गावठी भाज्या, फळे, कंदमुळे व रानमेवा घेऊन अनेक महिला विक्रेत्या बसल्या होत्या. देवळात येणारे भाविक आवर्जून ते खरेदी करत होते. त्यामुळे या विक्रेत्यांचा धंदा चांगला झाला. त्यामुळे व्यवसाईकांच्या रोजगाराचा प्रश्न सुटून चालना मिळाली असल्याचे व्यवसाईकांनी सांगितले. संकष्टी चतुर्थीनिमित्त मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. परिसरातील हॅाटेल, खेळण्याची व शोभिवंत वस्तुंची दुकाने, नारळ, हार , फुल व पापड मिरगुंड, कडधान्य विक्रेते, प्रसाद व पेढेवाले जय्यत तयारीत होते. मंदिर परिसरात मोठी वर्दळ पहायला मिळत होती. जणूकाही यात्रेचे स्वरूप आले होते. भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.



पृष्ठ क्र.१ वरुन...

## गार्डन मधील अनावश्यक असणारे शौचालय रद्द करा

सदरची गोष्ट संबंधित विभागातील अधिकारी राजेश कर्डिले यांच्यासोबत प्रत्यक्षरीत्या साईट विजीट करून नागरिकांच्या समवेत चर्चा करून प्रीतम दादांनी सदरचे शौचालय नागरिकांना नको असल्या कारणाने ते रद्द करण्यात यावे अशी मागणी केली आहे. त्यासाठी उपस्थित अधिकाऱ्यांनी सुद्धा नागरिकांसमोर शौचालय उभारण्यात येणार नाही या गोष्टीसाठी दुजोरा दिला. यासंदर्भात पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त यांची प्रत्यक्ष भेट घेऊन प्रीतम म्हात्रे यांनी शौचालय त्वरित रद्द करण्यासाठी आपण निर्देश द्यावे अशी मागणी त्यांनी केली. या संदर्भात आयुक्त देशमुख यांनी संबंधित विभागाला सदर शौचालय रद्द करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

## जितेंद्र आव्हाड यांच्यांसह सर्व अखेर जामीन मंजूर

असल्याचा युक्तिवाद ॲड कदम यांनी केला आहे. दाखल करण्यात आलेले गुन्हे जाणीवपूर्वक करण्यात आले असून कलम ७ हा वाढवू शकत नाही, कारण तशी तरतूद १९३२ साली करण्यात आली आहे जी महाराष्ट्रात लागू होत नसल्याचे त्यांनी म्हंटले आहे. दुसरीकडे जितेंद्र आव्हाड यांनी देखीलमी स्वतःहून चौकशी करता आलो होतो असे सांगत तपासाला मी पूर्ण सहकार्य केले असल्याचे त्यांनी न्यायालयात सांगितले. ही अटक ही पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचा दावाही कदम यांनी केला आहे.सरकारी वकील म्हणून ॲड अनिल नंदीगिरी कोर्टात पोलिसांची बाजू मांडली.

आव्हाडांना जेव्हा ताब्यात घेण्यात आल्यानंतर आय पी सी १४१, १४३, १४६, १४९, ३२३, ५०४, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(३), १३५ हे कलम लावण्यात आले होते. त्यानंतर कलम ७ वाढवून त्यांना तसेच त्यांच्या सोबत ११ जणांना अटक करण्यात आली असूनकलम ७ हा वाढवू शकत नाही, कारण तशी तरतूद १९३२ साली करण्यात आली आहे जी महाराष्ट्रात लागू होत नसल्याचे आव्हाडांचे वकील ॲड कदम यांनी युक्तिवाद केला आहे.

## शेकापला करंजाडेत आणखी एक धक्का; शेकाप कार्यकर्ते भाजपात

यावेळी त्यांचे उपस्थित मान्यवरांनी पक्षाची शाल देऊन पक्षात स्वागत केले. या पक्षप्रवेश सोहळ्याला भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस विनोद साबळे, पंचायत समितीचे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, करंजाडे विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, सागर आंग्रे, सुनील भोईर, तुशार नागे, सुरज शेलार, अतिश साबळे, जनार्दन फडके, रवी राजपूत यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

## वळवली गावात येत्या काळात अनेक विकासाची कामे होणार : परेश ठाकूर

प्रतिभा भोईर, कृष्णा पालेकर, गोवर्धन पाटील, आनंत भोईर, विजय भगत, महेश पाटील, चंद्रकांत पाटील, हरिचंद्र पाटील, हरिचंद्र चौधरी, रुपेश म्हात्रे, कचेर भोईर, माजी उपसरपंच दिपक पाटील, जगदीश उगडा, चंद्रकांत पारधी, गुरुनाथ पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## डॉ.सी.डी.देशमुख महाविद्यालयात एचआयव्ही एड्स विषयावर आधारीत जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धा संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, कोकण एज्युकेशन सोसायटीचे डॉ.चिंतामणराव देशमुख वाणिज्य व कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालय रोहा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग अलिबाग-रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने या महाविद्यालयाच्या सभागृहात नुकतीच एड्स प्रतिबंधात्मक जनजागृतीवर आधारीत प्रश्न मंजुषा स्पर्धा संपन्न झाली.

या प्रश्नमंजुषा स्पर्धेस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अतुल साळुंके प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच रायगड जिल्हा राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक प्रा.तुळशिदास मोकल,डापकू कार्यालयाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय माने, जिल्हा लेखापाल रविंद्र कदम, जिल्हा मूल्यमापन व सनियंत्रण रश्मी सुंकले,जिल्हा उपरूग्णालय रोहाचे आय. सी.टी.सी. समुपदेशक महेश गोसावी,प्रयोगशाळा तंत्रज्ञ मंगेश पाटील,रुपेश पाटील,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.अनंत थोरात, डॉ.गजानन मुनेश्वर आदी मान्यवर उपस्थित होते. एचआयव्ही एड्स विषयाबाबत विद्यार्थ्यांना ज्ञान प्राप्त व्हावे व त्या ज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांने समाज जागृतीसाठी करावा हा मुख्य उद्देश प्रश्नमंजुषा आयोजित करण्यापाठीमागचा होता. ही प्रश्नमंजुषा स्पर्धा एचआयव्ही एड्स विषय व त्या विषयाबाबतच्या जागृतीचे सर्वसाधारण ज्ञान,सखोल ज्ञान व सामान्य ज्ञानावर आधारीत तीन टप्यात घेण्यात आली. या प्रश्नमंजुषा स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील शेठ जे.एन.पालिवाला महाविद्यालय पाली, को.ए.सो. आनंदीबाई प्रधान महाविद्यालय नागोठणे, को.ए.सो. डॉ.सी.डी.देशमुख महाविद्यालय रोहा, के.एल.ई. महाविद्यालय कळंबोली,भाऊसाहेब नेने महाविद्यालय पेण,कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय कर्जत, जे.एस.एम. महाविद्यालय अलिबाग, डॉ. नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालय कोलाड, डी.जी.तटकरे महाविद्यालय तळा, वसंतराव नाईक महाविद्यालय मुरुड, टिकमभाई मेहता महाविद्यालय माणगांव,पी.एन.पी. महाविद्यालय वेशवी अलिबाग,पिलाई महाविद्यालय पनवेल, एम.बी.मोरे. महाविद्यालय धाटाव आदी महाविद्यालयाच्या टीम सहभागी झाल्या होत्या. या प्रश्नमंजुषा स्पर्धेत के.एल.ई. महाविद्यालय कळंबोलीच्या साक्षी सिंग व सुमन जाह यांच्या टीमने प्रथम क्रमांक मिळविला. तर डी.जी.तटकरे महाविद्यालय तळा महाविद्यालयाच्या सुमित मोरे व दामेश तांबट यांच्या टीमने द्वितीय क्रमांक आणि को.ए.सो.डॉ. सी.डी.देशमुख महाविद्यालयाच्या अनिशा शेटे व समृद्धी सानप यांच्या टीमने तृतीय क्रमांक मिळविला.

# पालीतील भोर संस्थानिक व ब्रिटिशकालीन कार्यालयांची (वास्तूंची) दुरावस्था

## दुर्मिळ वास्तूची मोडतोड, तुटलेल्या खोल्या झाल्या दारूचा अड्डा व मुताऱ्या

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पाली येथील रामआळी जवळ भोर संस्थानिकांची कचेरी तसेच ब्रिटिशकालीन जुने पोलीस स्थानक, तहसील व उपलेखा कार्यालय आणि न्यायालयाची वास्तू पूर्णपणे मोडकळीस आली आहे. या ब्रिटिश कालीन ऐतिहासिक वास्तूचे अक्षरशः खंडरमध्ये रूपांतर झाले आहे. येथील तुटलेल्या खोल्या आता मुताऱ्या झाल्या आहेत. तिथे अवैध धंदे देखील सुरू असल्याने ही वास्तू नगरपंचायतकडे हस्तांतरित करावी अशी मागणी पाली नगरपंचायतने संबंधित प्रशासनाकडे केली आहे.



येथील सर्व कार्यालये काही वर्षांपूर्वीच इतर नवीन इमारतीत हालविण्यात आली आहेत. भोर संस्थानाचे संस्थानिक पंतसचिव यांच्याकडे या कार्यालयाची कारभार पाहण्याची जबाबदारी ब्रिटिशांनी दिली होती असे इतिहास अभ्यासकांचे म्हणणे आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते जवळपास २००२ ते २००३ पर्यंत येथे कोर्ट, पोलिस स्थानक व उपलेखा कार्यलय सुरू होते. त्यावेळी या वास्तूची योग्य देखभाल आणि देखरेख होत होती. त्यांनतर मात्र येथे कोणतेच सरकारी कार्यालय राहिले नसल्याने ही ऐतिहासिक वास्तू दुर्लक्षित झाली. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडात या वास्तूने कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी चोख व भक्कमपणे पार पाडली. तसेच अनेक स्थित्यंतरे पहिली आहेत. शहराच्या मध्यवर्ती असलेल्या या वास्तूचा एक वेगळाच दबदबा होता. या वास्तूचे बांधकाम दगडी चिरेबंदी व विटांचे आहे. मात्र आता इथे सर्व पडझड झाली आहे. पाण्यामुळे भीती फुगल्या आहेत. पायऱ्या दरवाजे व खिडक्या तुटल्या आहेत. छत देखील तुटले आहे. अनेक जण येथे लघवी करण्यासाठी येतात. त्यामुळे इथे संपूर्ण दुर्गंधी पसरली आहे. येथे इतर गैरप्रकार देखील चालतात. काही जण मद्यपान करण्यासाठी देखील येथे येतात. प्रशासनाचे या महत्वाच्या वास्तुकडे पूर्णपणे दुर्लक्ष आहे.

# बिल्डरच्या चालक-मालक पिता-पुत्रांविरोधात फसवणुकीसह अॅट्रोसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तब्बल २० लाख रुपये देऊन खारघर थील नवकार रेसिडेन्सी इमारतीतील फ्लॅटची नोंदणी करणाऱ्या एका सफाई कामगाराला बिल्डरने गेल्या सात वर्षांमध्ये फ्लॅट न दिल्याने सफाई कामगाराने आपली रक्कम परत मागितली असता, बिल्डर पिता-पुत्रांनी त्याला उलट जातीवाचक शिवीगाळ करून त्याचा अपमान केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. त्यामुळे खारघर पोलिसांनी नवकार बिल्डरच्या चालक-मालक पिता-पुत्रांविरोधात फसवणुकीसह अॅट्रोसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.

मुंब्रा येथील ठाकुरपाडा भागात राहणारे तक्रारदार अविनाश रहाटे (२८) मुंबई महापालिकेत सफाई कामगार म्हणून कार्यरत आहेत. अविनाश यांना २०१५ मध्ये खारघर येथे घर घ्यायचे असल्याने, त्याने आपल्या मित्राच्या मध्यस्थीने नवकार बिल्डर्स अँड डेव्हलपर्सचे चालक-मालक सोहन जैन व त्यांचा मुलगा पियूष जैन यांची भेट घेतली होती. जैन यांनी त्यांच्या नवकार रेसिडेन्सी या इमारतीतील ६१५ चौरस फुटांचा वन बीएचके फ्लॅट ३३ लाख ८५ हजार रुपयांमध्ये विकत देण्याची तयारी दर्शवली. अविनाश यांनी

प्रथम नऊ लाख ४५ हजार रुपये व त्यानंतर फेब्रुवारी २०१५ ते जून २०१६ या कालावधीत १० लाख ५५ हजार रुपये अशी एकूण २० लाखांची रक्कम बिल्डरला दिली होती. मात्र २०१६ मध्ये सिडकोने नवकार रेसिडेन्सी इमारतीवर कारवाई करून ती पाडून टाकल्याने, जैन यांनी करंजाडे आणि वडघर येथे बांधण्यात येणाऱ्या नवीन इमारतीत घर देण्याचे कबूल केले होते. मात्र मागील सात वर्षांत त्यांनी फ्लॅट दिला नाही. त्यामुळे ऑगस्ट २०२१ मध्ये अविनाश यांनी आपले पैसे परत मागितले असता, जैन यांनी पैसे देण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर जैन पिता-पुत्राने फेब्रुवारी २०२२ मध्ये फ्लॅटच्या कराराचा ड्राफ्ट तयार करून फ्लॅटची उर्वरित ११ लाख रक्कम देण्यास सांगितले. मात्र अविनाश यांनी नकार देऊन, आपली रक्कम परत मागण्यास सुरुवात केली. त्यामुळे पियूष जैन याने अविनाश यांना गेल्या फेब्रुवारीत खारघर येथे भेटण्यास बोलावले. यावेळी पियूष याने भररस्त्यात अविनाश यांना जातीवाचक शिवीगाळ केली. त्यामुळे अविनाश रहाटे यांनी खारघर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते महिला लेफ्टनंट ऑफिसर ऋचा दरेकर यांचा सत्कार



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल मधील प्रथम महिला लेफ्टनंट ऑफिसर म्हणुन नियुक्ती मिळवुन आपल्या कतृत्वाने उत्तुंग यश संपादन करून ऋचा दरेकर यांनी अभिमानास्पद कामगिरी बजावली आहे. त्यांना मिळालेल्या या भरघोस यशामुळे रायगडकरांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी महाविद्यालयाच्या माध्यामतून ऋचा दरेकरचा सत्कार सोहळा शनिवारी आयोजित करण्यात आला होता. यावेळी संस्थेचे चेअरमन तथा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याहस्ते ऋचा दरेकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेल महापलिकेच्या माजी महापौर कविता चौतमोल, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, अॅडव्होकेट संजय पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य एस. के. पाटील, विजया कदम यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आणि मान्यवर उपस्थित होते.

# कर्जत तालुका वकिल संघटनेच्या अध्यक्षपदी अॅड. प्रविण खडे



**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत दिवाणी न्यायालयातील कर्जत तालुका वकिल संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा काल दि.११ नोव्हेंबर रोजी पार पडली व त्यामध्ये सन २०२२-२३ या वर्षाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकी संदर्भात चर्चा करण्यात आली.

संघटनेचे मावळते अध्यक्ष अॅड. सी. बी. ओसवाल यांनी अध्यक्ष पदावरुन पायऊतार होण्याचे जाहिर केल्यानंतर नवीन अध्यक्ष निवडीकरीता इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागविण्यात आले होते. मात्र अॅड. प्रविण शांताराम खडे यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही अध्यक्षपदाकरीता इच्छुक नसल्याकारणाने त्यांची कर्जत तालुका वकिल संघटनेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. तसेच अॅड. अनिल पाटील यांची उपाध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली. सदरील अध्यक्ष निवडणुकीच्या प्रक्रियेमध्ये अॅड. दिपक गायकवाड यांनी महत्वाची भूमीका बजावली. सदर प्रसंगी संघटनेचे माजी अध्यक्ष अॅड. सतिश डायरे तसेच संघटनेचे माजी पदाधिकारी अॅड.अमोल सुर्यवंशी व संघटनेचे सभासद अॅड. शैलेश पवार, अॅड. वसंत रवणे, अॅड. शिल्पी परदेशी, अॅड. रूपेश पाटील, अॅड. ऋषिकेश कांबळे, अॅड. जयेश म्हसे, अॅड. शरद सावंत, अॅड. भारत सावंत, अॅड. गितेश सावंत, अॅड. थोरवे, व इतर वकील सभासद हजर होते. संघटनेचे मावळते अध्यक्ष अॅड. सी. बी. ओसवाल यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्षांचा सत्कार करुन कार्यभार त्यांचेकडे सोपवला. सर्वांनी नवनिर्वाचित अध्यक्षांचे अभिनंदन करुन त्यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# करंजा गावातील अनिल थळी काळाच्या पडद्याआड

**दै.रायगड नगरी । उरण**

रमेश थळी उरण तालुक्यातील करंजा गावातील अनिल काशिनाथ थळी वय वर्षे ६६ यांचे दिर्घ आजार पणामुळे त्यांच्या राहत्या घरी ५ नोव्हेंबर २०२२रोजी दु:खद निधन झाले .

त्यांच्या मागे पत्नी, मुलगी, बहिणी, काका नातेवाईक असा थळी परिवार आहे. अनिल काशिनाथ थळी हे एन एडी करंजा येथे नोकरी करत असून करंजा गावात ते अष्टपैलू खेळाडू म्हणून ओळखले जात असत द्रोणागिरी माता ब्रास बॅन्ड पथकाचे संस्थापक म्हणून गणले जाणारे कबड्डी, क्रिकेट, खेळातील अष्टपैलू खेळाडू म्हणून ओळखले जाणार अनिल थळी यांनी रायगड, ठाणे, मुंबई अश्या जिल्हा स्तरावर खेळाच्या स्पर्धेत भाग घेऊन करंजा गावातचे व उरण तालुक्याचे नाव लौकिक कले होते. महाराष्ट्रातील कबड्डी कर्णधार जोन्स परेरा,सागर बांधेकर यांना उरण क्रिकेट मॅचला नाणे फेक करण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उरण तालुक्यात उपस्थिती करणारे अनिल थळी यांचे फार मोठे योगदान होते त्यांच्या पार्थिव देहावर करंजा वैकुंठ भूमीत अंतिम संस्कार करण्यात आले .त्यांच्या अंत यात्रेत गावातील, उरण तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते . त्यांनी कबड्डी, क्रिकेट, तसेच द्रोणागिरी ब्रास बॅड पथक या मध्ये आपले अस्तित्व निर्माण केले होते.त्यांच्या जाण्याने करंजा गावातील खेळाडू व द्रोणागिरी ब्रास बॅड मध्ये सहभागी असलेल्या तरुणांमध्ये पोकळी निर्माण झाली असून करंजा गाव शोक सागरात बुडाला आहे.



# गेल इंडियाच्या विरोधातील शेतकऱ्यांच्या हरकत अर्जावर १८ नोव्हेंबर रोजी सुनावणी

**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल, पेण व अलिबाग तालुक्यातील विविध गावामधून गेल इंडिया कंपनी कडून प्रोपेन पाईपलाईन तसेच पैट्रोलियम व खनिज पाईप लाईन प्रकल्प जात आहे.

दरम्यान उरण तालुक्यातील कळंबुसरे गावातील शेतकऱ्यांनी एकजुट होऊन दिनांक ०९ ऑक्टोबर २०२२ रोजी सदर प्रकल्पास प्रखर विरोध दर्शविला होता, शेतजमीनीतुन गेल इंडिया लिमिटेड या कंपनी मार्फत प्रोपेन पाईपलाईन तसेच पैट्रोलियम व खनिज पाईप लाईन विरोधात हरकत घेतलेल्या शेतकर्यांच्या अर्जावर बहुउद्देशीय सभागृह जे.एन.पी.टी.येथे दिनांक १८ नोव्हेंबर २०२२ रोजी दुपारी २.३० वाजता सुनावणी ठेवण्यात आली आहे. गेल इंडिया कडून या सुनावणीच्या नोटिसा शेतकऱ्यांना बजावण्यास सुरवात झाली असून या नोटिस मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे सदर सुनावणीस शेतकरी स्वतः अथवा आपले अधिकृत प्रतिनिधी यांनी आपल्याकडील मुळ कागदपत्रासह वेळेत हजर राहण्याची विनंती केलेली आहे. तसेच आपण अथवा आपले अधिकृत प्रतिनिधी वरील दिवशी व वेळी हजर न राहिल्यास आपणास काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून पुढील योग्य ती कार्यवाही या कार्यालया कडून करणेत येईल. असे दर्शविले आहे.

दरम्यान शेतजमीनीतुन पाईपलाईन टाकल्यास आजुबाजूचे क्षेत्र देखील लागवडीयोग्य राहणार नाही. शेतक-यांवर भविष्यात उपासमारीची वेळ येणार आहे तसेच भविष्यात वायुगळती सारखे प्रकार झाल्यास जीवीताला धोका निर्माण होणार आहे. याअगोदरही लगतचे क्षेत्रामधुन एल पी जी पाईपलाईन गेलेली असल्याने त्यामध्ये बरेच क्षेत्र संपादीत झालेले आहे. सदर संपादीत क्षेत्राची नुकसान भरपाई प्रकल्पग्रस्त शेतक-यांना अदयापही मिळालेली नाही. त्यामुळे गेल इंडिया लिमिटेड कंपनीच्या प्रकल्पास शेतकऱ्यांनी अगोदरच सक्त विरोध दर्शविले आहे.




## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशील हे श्री. विनायक श्यामराव गवळी त्यांच्या मालकीची व ताबेकैंजातील सदनिका क्र. डी-१२०१, बारावा मजला, डेल्टा सेन्टरल, प्लॉट क्र. ४, सेक्टर २३, खारघर, नवी मुंबई (यांपुढे त्या सदनिकेला संक्षिप्तपणे 'सदरहू मालमत्ता' म्हणून संबोधले जाईल).

सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझे आशिल यांचे आपत्य/मुलगा श्री. सागर विनायक गवळी यांना त्यांनी सर्व व सदरहू मालमत्ता पासून बेदखल किंवा/व सर्व प्रकारच्या कार्यापासून वंचित किंवा/व सोडलेले आहे. तसेच पुढे सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझ्या अशिल यांच्या मालकीची सदरहू मालमत्ता बाबत आपत्य/मुलगा श्री. सागर विनायक गवळी यांनी कुठल्याही प्रकारचा हिंतसंबंध व अधिकार याबाबत कोणा त्रयस्थ व्यक्तिसमवेत समझोता करार, साठे करार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसा हक्क, ट्रस्ट, न्यास, ताबा, कुळ, भाडेपट्टा, लियन, त्याच्या लग्नातून उदभवणा-या त्याच्या पत्नीचा कुठल्याही प्रकारे पोडगी/इतर अधिकार किंवा इतर बाबी द्वारें हरकत किंवा दावा असेल तर त्यांना विनंती करण्यात येते की तशा प्रकारची हरकत किंवा दावा ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून किंवा नोटीस प्रसिद्ध पूर्व केले असतील तर ते सर्व प्रकारचे हक्क व अधिकार असल्यास बाद किंवा संपुष्टात आला आहे. माझे आशिल त्यांच्या आपत्य/मुलगा श्री. सागर विनायक गवळी यांच्या कुठल्याही प्रकारेचे व्यवहारांस जबाबदार राहणार नाही.

सही/-
**अॅड. मंगेश मधुकर चव्हाण**
**शॉप क्र. सी - ३१३, पहिला मजला,**
**वाशी प्लाझा, प्लॉट क्र. ८० - ८१,**
**सेक्टर - १७, एच.डी.एफ.सी. बँक,**
**वाशी, नवी मुंबई ४००७०३**
**९८२०४२१३३९**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत श्री.राजकुमार महावीरप्रसाद मोदी रा.४५ डिवाईन, एन.एस.रोड नं.९, जुहू, मुंबई यांच्या मालकी हक्कात व त्यांचे ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली मिळकत, प्लॉट व जमीन आमचे अशिल १) कुलदीप सिंग संधू, २) रेजविंदर सिंग संधू रा.प्लॉट नं.६९, नंदनवन को.ऑप.हौ.सो., ३ री लेन, एपीजय स्कूल, सेक्टर-१७, नेरुळ (ई) नवी मुंबई ४००७०६ कायमस्वरुपात विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**
**मे.सुपर फॉरगींग अॅण्ड स्टील लि. प्लॉट नं.१९१९, सेक्टर नं. के डब्ल्यू ई ऑफ कळंबोली, क्षेत्र ९०० चौ.मी.**

सदरहू जागा, प्लॉट व मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा-कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून १५ दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्यावर समक्ष वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे विहित मुदतीत कोणत्याही हरकती दाखल न झाल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजाविरहित आहे व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस आमचे अशिल कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

पनवेल
दि.१२/११/२०२२

सही/-
**अॅड.सुचिता स. पाटील**
**अॅड.तरबेज अ. मास्टर**
**ऑफिस : माणेक नगर, शॉप नं.३,**
**परदेशी आळी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

मे.सोनावणे साहेब कोर्ट
अॅड.साजिद यु. कच्छी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज, (सिनिअर डिव्हीजन) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.१४६०/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१५/१२/२०२२

१) श्रीमती.रोशन शमशुद्दीन नालबंद वगैरे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, कै.समसुद्दीन कासम नालबंद दि.२७/०६/२००५ रोजी मु.पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले आहे. त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी केलेला आहे.

**अ) मौजे पनवेल येथील सि.टी.सर्व्हे नं.८४० पैकी आणि सी.स.नं.८४१ वरील अंबर आर्केड / दारुवाला बिल्डींगमधील निवासी सदनिका क्र.२०७, क्षेत्र १४० चौ.फूट कारपेट**

अर्जदार हे कै.समसुद्दीन कासम नालबंद यांच्या वारस हक्कासंबंधी गहाण दान, बक्षिस, लीज लीन, साठेकरार, तारण, कुळहक्क, खरेदी, विक्री अथवा तत्संबंधित कोणत्याही हक्काने अगर अन्य कुणासही हरकत घेण्याची असल्यास अशा संबंधित व्यक्तीने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत लेखी हरकत स्वतः अथवा वकीलामार्फत सादर कराव्यात.

सदर नोटीसीच्या मुदतीत अन्य कुणाचीही हरकत वगैरे न आल्यास व अर्जदार यांनी दिलेला पुरावा सिद्ध झाल्यास या अर्जदारांच्या लाभांत वारस दाखला दिला जाईल, याची संबंधित व्यक्तींनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.०७/११/२०२२ रोजी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.श्री.गोडसे साहेब
अॅड.धर्मनाथ नामा गोंधळी
अॅड.शोभना धर्मनाथ गोंधळी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात
चौ.अर्ज नं.१६०३/२०२२

श्रीमती.पुनम संजय सिंग — अर्जदार

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडील कै. संजय चंद्रभान सिंग हे दि.२६/०७/२०२२ रोजी मृत्यू पावले आहेत. त्यांची मौजे : कळंबोली येथे खालील वर्णनाची मिळकत होती. तचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.नं. | नाव | मिळकतीचे वर्णन | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | कै.संजय चंद्रभान सिंग | निळकंठ हाईटस हौ.सो. लिमिटेड ए-११०२, ११ वा मजला, प्लॉट नं.४३ ए, ४४ ए, सेक्टर-१६, कळंबोली, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड | ९९५ चौ.मी. व ६१,००,०००/- रु. |
| २ | कै.संजय चंद्रभान सिंग | रोजेश एस.सी. २६०५, २६ वा मजला इंडिया बुल पार्क कोन व्हिलेज पनवेल-रायगड | १७०० चौ.मी. व ६९,७५,०००/- |

वरील मिळकतीचे कोणतेही साठेकरार, विक्री करार, फरोक्त खत, गहाणखत, बक्षिसपत्र असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी अगर तोंडी हरकत घ्यावयाची आहे. वरील मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांना वारस दाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.११/११/२०२२

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## ९ वर्षीय मुलाचे अपहृत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घराच्या परिसरात खेळात असलेल्या एका ९ वर्षीय मुलाचे अपहृत झाल्याने याबाबतची तक्रार त्याच्या वडिलांनी तळोजा पोलीस ठाण्यात केली आहे.

राज अशोक चव्हाण (वय ०९) रा. राजाराम म्हात्रे चाळ, नावडे गाव, रंग गोरा, अंगाने सडपातळ, नाक सरळ, डोळे काळे, केस काळे बारीक असून अंगात काळ्या रंगाचे हाफ टी शर्ट व निळ्या रंगाची फुल जीन्स पँट व गुडघ्यावर फाटलेली आहे. तसेच गळ्यात पंचरंगी धातू त्यात छोटी पेटी आहे. या मुलांबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास तळोजा पोलीस ठाणे फोन – ०२२–२७४१२३३३ किंवा पोलीस उप निरीक्षक एस. ए. होलार, मोबाईल नंबर ८१०८१६१७०९ येथे संपर्क साधावा.

## १८ नोव्हेंबर रोजी ओबीसींच्या विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

ओबीसींच्या विविध मागण्यासाठी शुक्रवार दि.१८ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी ११ वाजता अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून रायगड जिल्ह्यातील ओबीसी बांधवांनी लाखोंच्या संख्येने सहभागी व्हावे. असे आवाहन ओबीसी महासंघाचे मुरूड तालुका अध्यक्ष अॅड. रुपेश पाटील यांनी केले आहे.

आमच्या प्रतिनिधीशी बोलताना त्यांनी सागीतले कि, आमच्या मागण्या पूर्ण होईपर्यंत आता हा लढा थांबणार नाही तो सुरुच राहणार आहे . तरी शासनाने याचा गांभीर्याने विचार करावा. असेही त्यांनी म्हटले आहे. ओबीसींच्या प्रमुख मागण्यांमध्ये ओबीसी ची जातिनिहाय जनगणना झालीच पाहिजे, ओबीसी विद्यार्थी– विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती मिळावी, ओबीसी विद्यार्थीनींसाठी वसतिगृहे उभारण्यात यावीत, ओबीसींना राजकीय, शैक्षणिक, आरक्षण देण्यात यावे त्याचबरोबर ओबीसी आर्थिक विकास महामंडळाला आर्थिक निधी मिळावा. या प्रमुख मागण्यांसह शेतीमालाला योग्य भाव मिळावा.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


### रायगड भुषण प्रा.एल.बी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली....

# नवघर ग्रामस्थांचा १५ नोव्हेंबर रोजी द्रोणागिरी सिडको येथे विविध मागण्यासाठी उपोषण

**दै.रायगड नगरी । उरण**

**उरण तालुक्यातील नवघर गाव व गाव परिसरातील विविध समस्या व ग्रामस्थांच्या मागणी संदर्भात मागील गेल्या दहावर्षा पासून रायगड भूषण प्रा.एल.बी.पाटील आणि मर्मगंध पाटील या पितापुत्रांनी सातत्याने अर्ज विनंत्या करून, सतत पाठपुरावा करून सुद्धा सिडको प्रशासनाला जाग येत नाही. सिडको प्रशास–नाने जाणून बुजून नवघर ग्रामस्थांच्या समस्या व मागणी कडे दुर्लक्ष केल्याने नवघर ग्रामस्थ १५ नोव्हेंबर २०२२ रोजी द्रोणागिरी सिडको येथे लाक्षणिय उपोषण करणार आहेत.**

झोपलेल्या सिडको प्रशासनाला जागे करण्यासाठी पुन्हा एकदा सिडको विरोधात उपोषण करण्याचा निर्धार ग्रामस्थांनी केला आहे.अनेक अर्ज विनंत्या करून सिडको प्रशास–नाला जाग येत नाही.म्हणून दि.६ जून २०२२ रोजी नवघर ग्रामस्थांचे प्रा.एल.बी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली नव्याने होऊ घातलेल्या नवघर रेल्वे स्टेशनला नवघर रेल्वे स्टेशन हेच नाव देण्यात यावे,नवघर ते नवघरफाटा रूग्णवाहीका तसेच छोटी वहाने येण्या–जाण्यासाठी रेल्वे क्रॉसिंग रस्ता करणे,मौजे नवघर येथे होणा–या रेल्वे स्टेशनमध्ये निर्माण होणा–या नोक–या आणि व्यवसायामध्ये स्थानिक मौजे नवघर सिडको प्रकल्पग्रस्तांना प्रथम प्राधान्य द्यावे तसेच इतर मागण्यांसाठी द्रोणागिरी नोड सिडको कार्यालय बोकडवीरा येथे धरणे आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी द्रोणागिरी नोडचे अधिकारी नहाने यांनी सिडकोचे वरिष्ठ अधिकारी सेवतकर यांच्या सोबत ऑन स्पीकर फोनवर प्रा.एल.बी.पाटील सहीत नवघर ग्रामस्थांची चर्चा घडवून दिली असता प्रा.एल.बी.पाटील यांनी येथील रेल्वे स्टेशनमुळे उद्भवणा–या समस्या सिडकोचे वरिष्ठ अधिकारी सेवतकर यांना समजावून सांगितल्या असता आपल्या समस्या योग्य असून नवघर ग्रामस्थांची सिडकोच्या वरिष्ठ अधिकारी तसेच रेल्वे प्रशासना सोबत सयुक्त बैठक घेऊन योग्यच निर्णय घेण्याचे मान्य केले केले होते .सिडको आधिकारी सेवतकर आणि नहाने यांच्या सोबत झालेल्या चर्चे नुसार तूर्तास उपोषण स्थगित करण्यात आले असता जर १५ सप्टेंबर २०२२ पर्यंत ग्रामस्थांसोबत बैठक घेऊन जर योग्य निर्णय दिला नाही तर १५ सप्टेंबर नंतर आम्ही नवघर ग्रामस्थ उग्र आंदोलन करणार असे ग्रामस्थांसहीत रायगड भूषण प्रा.एल.बी.पाटील यांनी ठणकावून सांगितले होते. असे असताना सिडको प्रशासनाला याची जाणीव नाही असेच दिसून येत आहे तसेच नवघर ग्रामस्थांच्या लाक्षणिक उपोषणाच्या वेळी झालेल्या वाटाघाटीच्या चर्चेचा सिडको प्रशासनाला विसर पडलेला दिसत आहे. ग्रामस्थांना सिडको व रेल्वे प्रशासनाकडून कोणतेही योग्य ते प्रतिसाद अजूनही मिळाला नाही.म्हणून या गेंड्याच्या कातडीच्या सिडको प्रशासनाला झोपेतून जागे करण्यासाठी पुन्हा जेष्ठ साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते रायगड भूषण प्रा.एल.बी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली नवघर ग्रामस्थांनी १५ नोव्हेंबर २०२२ रोजी ठिक १०–३० वाजल्यापासून द्रोणागिरी नोड, सिडको कार्यालय बोकडवीरा येथे लाक्षणिय(उपोषण) धरणे आंदोलन करण्याचा निर्धार केला आहे. या उपोषणाला ग्रामस्थांनी,नागरिकांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी, विविध सामाजिक संस्था, संघटनांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपोषणाला जाहीर पाठिंबा द्यावा असे आवाहन जेष्ठ साहित्यिक, रायगड भूषण प्राध्यापक एल बी पाटील यांनी केले आहे.

## ट्रेलरला बोलेरोची धडक; १ ठार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिग्नलवर उभ्या असलेल्या ट्रेलरवर पाठीमागून भरधाव वेगाने येणारी बोलेरो पिकअप जिप धडकल्याचा प्रकार मध्यरात्री कळंबोली सर्कल येथे घडला. या अपघातात बोलेरो जीपमधील एक व्यक्ती ठार झाला, तर चालक गंभीर जखमी झाला. खांदेश्वर पोलिसांनी या अपघाताला जबाबदार असलेल्या बोलेरो चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

मृत सिकंदर बिलाशी बैठा (४५ ) आणि चालक बिरेंदर यादव (३०) दोघेही मुंबईत राहणारे आ–हेत. पनवेल येथून मुंबईच्या दिशेने रात्री जात होते. कळंबोली सर्कल जवळील सिग्नलवर उभ्या असलेल्या ट्रेलरवर पाठीमागून बोलेरो धडकली. यामध्ये बोलेरोतील दोघेही गंभीर जखमी झाले. एमजीएम रुग्णालयात दोघांना उपचारासाठी दाखल करण्यात आले. रक्तस्राव झाल्याने सिकंदर बैठा यांचा मृत्यू झाला. बोलेरो सिग्नलवर उभ्या असलेल्या ट्रेलरवर स्वतःहून धडकल्याने अपघात झाल्याचे आढळले आहे.

## कर्जतमध्ये शिवप्रताप दिनानिमित्त इतिहासाची झाली उजळणी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना कर्जत विधानसभा विभागाच्या वतीने शिवप्रताप दिन साजरा करण्यात आला. या सोहळ्यात अफजल खानाचा वध पोवाडा व व्याख्यानाच्या माध्यमातून उभा केला. यावेळी उपस्थितांच्या अंगावर शहारे आले. यावेळी कर्जतचा माहीत नसलेला इतिहासही व्याख्यात्यांनी सादर कटुन इतिहासाची उजळणी केली.

कर्जतच्या लोकमान्य टिळक चौकामध्ये शिवप्रताप दिनाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी दीप प्रज्वलित करून समारंभाचे उदघाटन केले. याप्रसंगी जिल्हा सचिव जे. पी. पाटील, उपजिल्हाध्यक्ष सचिन कर्णुक, विधानसभा सचिव धनंजय दुर्गे, तालुकाध्यक्ष महेंद्र निगुडकर, महिला जिल्हाध्यक्ष सपना राऊत, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष प्रसन्न बनसोडे, शहराध्यक्ष समीर चव्हाण, नगरसेवक हेमंत ठाणगे आदी उपस्थित होते.

महेंद्र निगुडकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. जितेंद्र पाटील यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर शिवशाहीर वैभव घरत व त्यांच्या सहकाऱ्यांनी पोवाडा सादर करून वातावरण निर्मिती केली. शिवव्याख्याते ॲड. रवींद्र यादव यांनी आपल्या व्याख्यानात प्रताप गडावरील रणसंग्राम उभा केला. यावेळी उपस्थितांचे अंग शहारले. त्यानंतर अनेकांना माहीत नसलेला कर्जतचा इतिहास सादर करण्यात आला.



त्यामुळे इतिहासाची उजळणी झाल्याचा अनुभव अनेकांना आला. सई भोसले या विद्यार्थिनीने शिवाजी महाराजांचा प्रताप गडावरील एक प्रसंग कथन केला. सूत्रसंचालन संदीप बोराडे यांनी केले.

याप्रसंगी विकास चित्ते, सुनील साठे, महेंद्र कर्वे, साईनाथ श्रीखंडे, विशाल जोशी, अभिषेक दर्गे, महेश सोगे, संजय तण्णा, सतीश येरूनकर, चिन्मय बडेकर , प्रज्योत घोसाळकर, यशवंत भवारे, मिलिंद मिसाळ, नाना खेडेकर, हरेश्र्वर भोईर, समीर सुर्वे, दिनेश बोराडे, हेमंत चव्हाण, सुभाष नाईक, सागर भोईर, तेजश्री भोईर आदी उपस्थित होते.

## खारघरमध्ये बेकायदा मोटार वाहन दुरुस्ती व फळविक्री करणाऱ्यावर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोटार वाहनदुरुस्ती करणाऱ्या १२ जणांवर फौजदारी कारवाई केल्यानंतर खारघर पोलिसांनी त्यांचा फळविक्रेत्यांकडे वळविला आहे. खारघर सेक्टर २० व २१ येथील तिघांवर भारतीय दंड संहिता २८३ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला.

निळकंठ स्वीट या दुकानासमोरून ओवे गावाकडे जाणाऱ्या मार्गावरील विक्रेते सुलतान शेख व तौकीर शेख यांच्यावर कारवाई करण्यात आली. तसेच सेक्टर २० येथील ग्रीन हेरीटेज इमारतीसमोरील मार्गावर नारळपाणी विक्रेता सरफराज शेख याच्यावर पोलिसांनी फौजदारी कारवाई केली.खारघरमध्ये रस्त्याकडेला व रस्त्याच्या अगदी मधोमध दोनशेहून अधिक विक्रेते बेकायदा व्यवसाय करतात.

पालिकेने कारवाई करुनही फेरीवाले रस्ता सोडत नसल्याने शहरातील रस्ते मोकळे करून वाहतूक कोंडी फोडण्यासाठी बेकायदा व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाईचे सत्र खारघर पोलिसांनी सुरू केले आहे. याबाबत खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीपान शिंदे यांना विचारले असता त्यांनी अनेकदा पोलिसांनी तोंडी सांगूनही रस्ता अडवून व्यवसाय केल्यामुळे वाहतूक कोंडी होत असल्याने ही कारवाई करणे भाग पडल्याचे सांगितले.


Kokilaben Dhirubhai Ambani hospital
NAVI MUMBAI
Every Life Matters



कॅन्सरशी
लढा देण्यास कटीबद्ध

रेडिएशन ऑन्कोलॉजी | मेडिकल ऑन्कोलॉजी | सर्जिकल ऑन्कोलॉजी



कर्करोगासाठी सर्वोत्कृष्ट केंद्र

ऑर्गन स्पेसिफिक कॅन्सर स्पेशालिस्ट यांची टीम
किमान छेद देऊन केली जाणारी युरो ऑन्कोलॉजी शस्त्रक्रिया
रिकंस्ट्रक्टिव शस्त्रक्रिया
टू बीम रॅपिड आर्क प्रिसिजन रेडिएशन थेरपी
केमोथेरपी । इम्युनोथेरपी । टार्गेटेड थेरपी
केमोथेरपी डे केअर सेंटर - प्रशिक्षित स्पेशालिस्ट परिचारिका उपलब्ध
खास डिझाईन करण्यात आलेले ल्युकेमिया आणि लिम्फोमा क्लिनिक्स
पुढच्या टप्प्याच्या कर्करोगांसाठी HIPEC
ट्यूमर बोर्ड

सेवेत समर्पित
२५४ स्पेशलाईज्ड डॉक्टर्स
विश्वस्तरीय पायाभूत सुविधा आणि जगातील उत्तम दर्जाचे तंत्रज्ञान

जागतिक दर्जाच्या परिणामांचा विश्वास

EMERGENCY +91 22 7198 1111
APPOINTMENTS & BOARD LINE +91 22 7197 9797

Thane-Belapur Road, Opp Koparkhairane Station, Navi Mumbai – 400 710, India; navimumbai.kokilabenhospital.com /KDAHNaviMumbai